Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – I January – February 2025

# ऑनलाईन शिक्षणाचे फायदे आणि तोटे

**नितीन उत्तम खिल्लारे**
पीएच.डी. संशोधक विद्यार्थी,
शिक्षणशास्त्र

**प्रस्तावना**

आजच्या डिजीटल युगात आपण सर्वचजन जास्तीत जास्त काम ऑनलाईन करण्यावर भर देत आहेत. अगदी घरगुती वस्तु खरेदी करण्यापासून ते डॉक्टरांचा सल्ला घेण्यापर्यंत असो किंवा पैसे काढणे अथवा टकने असे आर्थिक व्यवहार ही मोठ्या प्रमाणात आपण ऑनलाईन पध्दतीनेच करत आहोत त्याचप्रमाणे आज शिक्षण क्षेत्रातही ऑनलाईन पध्दतीचा मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यात येत आहे. आज विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून ते त्यांच्या परिक्षा व निकाला पर्यंतच्या सर्वच गोष्टी ऑनलाईन पध्दतीने होत आहेत. कोरोना काळात तर सर्वत्र या ऑनलाईन शिक्षण पध्दतीचा उपयोग सर्वच शाळा आणि

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

महाविद्यालयामध्ये केला. आज डिजिटल तंत्रज्ञानाच्या विकासामुळे शाळा आणि महाविद्यालये ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरून मुलांच्या घरापर्यंत आली आहेत. आज डिजिटल युगात आपण सर्वजन वावरत आहोत आज आपण सर्वांनी या ऑनलाईन पध्दतीचा स्विकार केला आहे. याचे कारण ही पध्दती आपल्या सोयीनुसार आपल्याला सहजपने व कधीही उपयोगात आनता येते. त्यामुळे आज या ऑनलाईन पध्दतीचा उपयोग सर्वच क्षेत्रात आपण मोठ्या प्रमाणात करत आहोत त्यातच आपल्या शिक्षण क्षेत्रातही आज आपण या पध्दतीचा उपयोग मोठ्या प्रमाणात करत आहोत तर या ऑनलाईन शिक्षण पध्दतीचे कोणते फायदे आणि कोणते तोटे आहेत या बाबीचाही विचार होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे या ऑनलाईन शिक्षण पध्दतीचे फायदे आणि तोटे आपणास पुढील प्रमाणे सांगता येतील.

**ऑनलाईन शिक्षणाचे फायदे :**

प्रत्येक गोष्टीमध्ये काही ना काही कारण असते कोणतीही गोष्ट या जगता विनाकारण होत नसते तसे कोणत्याही चांगल्या गोष्टी बरोबर काही वाईट गोष्टीही येतात परंतु त्या वाईट

गोष्टी बाजूला सारून त्यातील चांगल्या बाबीचा स्विकार करने महत्त्वाचे असते तसे ऑनलाईन शिक्षणाची कोणते फायदे आहेत ते खालील प्रमाणे आहेत.

**१. वेळेची व खर्चाची बचत :**

ऑनलाईन शिक्षणाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे वेळेची आणि खर्चाची बचत होते. कारण ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी आपणाला प्रत्यक्ष शाळा, महाविद्यालय किंवा क्लासेसला जाण्याची गरज नसते. आपल्या घरीच राहून तो शिक्षण घेऊ शकतो, त्यामुळ जाण्या येण्याच्या वेळत बचत होत व तेथे राहण्याचा व इतर खर्च करण्याची आवश्यकता राहत नाही त्यामुळे त्याचा वाया जाणारा वेळ वाचतो व त्य वेळेचा उपयोग तो इतर चांगल्या कामासाठी वापरू शकतो.

**२. आरामदायी आणि सोयिस्कर :**

ऑनलाईन शिक्षणाचा दसुरा फायदा म्हणजे ते आरामदायी आणि सोयीस्कर आहे कारण ऑनलाईन शिक्षणात लेक्चर पुन्हा-पुन्हा पाहण्याची सोय असते. त्यामुळे आपाणला एखादी बाब समजली नाही किंवा एखादी एखादी तासिका आपण जॉईन नाही करू शकलो तर ती पुन्हा पाहण्याची व्यवस्था असते व तो व्हिडीओ आपण पुन्हा-पुन्हा पाहु शकतो. यात वापर कर्त्याच्या सोयीनुसार त्याचा उपयोग आपणाला करता येतो.

**३. गॅझेट फ्रेडली :**

ऑनलाईन अभ्यासासाठी मुलांना लॅपटॉप, नोटबुक आणि टॅबलेटची आवश्यकता असते, कारण मुलांना व्हाट्सअॅप आणि जीमेल, गुगलमेट, झुम अॅप सारख्या हायटेक सोशल एप्लीकेशन्सवर गृहपाठ दिला जातो त्यांची चाचणी, परीक्षा घेतली जात असते. त्याचबरोबर मुले व्हिटीओ चॅटद्वारे शिक्षकांशी संवाद साधतात मुलांसाठी लहान वयात गॅझेटच्या संपर्कात येते त्यांच्या संज्ञानत्मक कौशल्याच्या दृष्टीने फायदेशीर ठरू शकते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मुलांना वाचनाच्या नविन पध्दतीचा परिचय होतो.

**४. अभ्यासाची उजळणी करण्यास सोपे :**

ऑनलाईन शिक्षणात अभ्यासाची उजळणी करणे अत्यंत सोपे असते. कारण यात व्हीडीओ रेकॉर्ड होत असतात. विद्यार्थी शाळेत किंवा ट्युशनला उशिरा गेला की झालेला भाग त्याला शिकवला जात नाही, परंतु ऑनलाईन शिक्षणात तसे होत नाही. ऑनलाईन झालेले लेक्चर व्हीडीओच्या माध्यमातून शिक्षक सेव्ह करून विद्यार्थ्यांना पाठवू शकतात. जर एखादा तास मिस झाला तर तो व्हीडिओ पुन्हा-पुन्हा पाहता येतो व व्हीडिओ पुन्हा-पुन्हा पाहण्याची सोय असल्यामुळे उजळणी करणे सोपे होते.

या सारखे बरेच ऑनलाइन शिक्षणाचे चांगले फायदे आहेत तसेच त्यंचे काही दुष्परिणाम सुध्दा आहेत. आपण ऑनलाईन शिक्षणाचे कोणते तोटे आहेत ते खालीप्रमाणे पाहू.

**ऑनलाईन शिक्षणाचे तोटे :**

ऑनलाईन शिक्षणाचे फायदे जसे आहेत तसेच त्याचे तोटे सुध्दा आहेत तर या तोट्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीत तर त्याचा कमीत कमी उपयोग करून चांगल्या बाबी स्विकारून आपल्याला सकारात्मक बाबीकडेच लक्ष द्यावे लागेल तर याचे तोटे खालील प्रमाणे सांगता येतील.

**१. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खुंटू शकतो :**

ऑनलाईन शिक्षणाचा सर्वात मोठा तोटा म्हणजे आत्मविश्वास खुंटू शकतो, कारण यात बाहेरच्या वातावरणात जास्त वेळ घालण्याची संधी मिळत नाही. मुलांचा मानसिक व सामाजिक विकास होण्यासाठी सामाजिक संवाद देखील महत्त्वाचा असतो तो या पध्दतीत मिळत नाही. वर्गामित्राचा गट मुलांना बाहेरील वातावरणात मिसळण्यात मदत करू शकतो आणि यातून मुलांचा आत्मविश्वास वाढू शकतो तो या ठीकाणी वाढत नाही.

**२. ध्येयापासून दूर जान्याचा धोका :**

ऑनलाईन शिक्षणाचा उपयोग करतांना मुलांचे मन इकडे तिकडे भटकू शकते. मुले अभ्यासाच्या बहान्याने मोबाईल व गेम खेळण्यात व इतर चुकीच्या व अनावश्यक गोष्टी पाहण्यात आपला वेळ खर्ची घालू शकतात कारण सर्वच पालकांना आपल्या पाल्यावर रोज

रोज लक्ष ठेवणे शक्य होत नाही त्यामुळे याकाळात त्यांना अभ्यासात चांगला विकास करने कठीन होते.

**३. डोळयाचा विकार होण्याचा धोका :**

ऑनलाईन शिक्षणात मुलांना आपली नजर दिर्घकाळ स्क्रिनवर ठेवावी लागते. कॅम्प्युटर किंवा लॅपटॉप किंवा मोबाईलवर जास्त वेळ घालवल्याने मुलांच्या डोक्यावर त्यांचा वाईट परिणाम होतो. स्क्रीनकडे एकटक पाहण्याने मुलांच्या डोळ्यावर दबाव येतो. अनेक वेळा मुले अंधुक दिसण्याच्या तक्रारी करतात. अश्यामुळे चष्मा लागण्याचे प्रमाण वाढते.

**४. शिस्त लागत नाही :**

ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना शाळा महाविद्यालयात जशी शीस्त पाळावी लागते तशी ऑनलाईन शिक्षणात पाळावी लागत नाही. त्यामुळे मुलामध्ये शिस्त राहत नाही शाळेत महाविद्यालयात युनिफॉर्म घालणे, केस व्यवस्थित कापने, व्यवस्थित पोशाख करने, वेळेवर सर्व गोष्टी करने अशी जी शिस्त असते ती यामध्ये लागत नाही.

अश्याप्रकारे आज आपण ऑनलाईन शिक्षाचे फायदे व तोटे पाहिली आहेत. कोणत्याही बाबींच्या दोन बाजू असतात एक चांगली आणि दुसरी वाईट तर आपण चांगल्या बाबींचा उपयोग आपल्या जीवनात करणे महत्त्वाचे असते. तंत्रज्ञानाचा उपयोग चांगल्यासाठी घ्यायचा का वाईट कामासाठी घ्यायचा हे त्याचा वापर करण्यावर अवलंबून असते. आज ऑनलाईन शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात उपयोग आपण करत आहोत त्या दृष्टीने त्यांच्या फायद्याची व तोट्याची चर्चा करने व त्याचा उपयोग होणे गरजेचे आहे.

**संदर्भ:**

1. जगताप ह.ना., प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान-पुणे
2. डॉ. सीमा येवले., शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञान – पुणे
3. पवार यु. व्ही., अध्ययन अध्यापन व मुल्यमापनात नवोपक्रमांचा वापर इनसाईड नाशिक.
४. https://marathi.webdunia.com
५. https://srdalvifoudation.com
६. https://marathi.indiatimes.com